LOKNETE DR.BALASAHEB VIKHE PATIL. (PADMABHUSHAN AWARDEE) Establishment 4 August 2004
PRAVARA RURAL EDUCATION SOCIETY'S

# ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, ALKUTI

ID.No. PU/AN/ACS/78/2004
College code No.757
A/P. Alkuti, Tal. Parner, Dist. Ahmednagar. Pin-414305



- Phone: (02488) 250457 Email ID : Principal.acsalkuti@pravara.in

# Self Study Report : 2023 (1 st Cycle)




## Criteria - 3 | Reaserch, Innovation & Extention

## KEY INDICATOR : 3.3 | Research Publications and Awards

**3.3.1 Number of research papers per teacher in the Journals notified on UGC website during the last five years**

# Index 2018


| **Sr. No.** | **Title of paper** | **Name of the author/s** | **Name of journal** | **ISSN Number** | **Page No.** |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Sanshodhanache Swarup,Sankalpna, Prayojane | Kavade K.B. | Sanshodhanacha Navya Disha | 2320-4494 | 3-11 |

नॅक पुनर्मूल्यांकित 'A' ग्रेड

# पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर

(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित)

व

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

पॉवर ऑफ नॉलेज
विशेषांक
एप्रिल २०१८

ISSN-2320-4494
UGC approved
Sr.No. 45681

# संशोधनाच्या नव्या दिशा

संपादक
डॉ. माहेश्वरी गावित

संशोधनाच्या नव्या दिशा

© प्राचार्य
पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर.

मुख्य संपादक
डॉ. माहेश्वरी गावित

प्रकाशक
श्रीमती लता सदाशिव सरकटे
POWER OF KNOWLEDGE
ISSN 2320 - 4494 UGC APPROVED NO - 45681
RNI NO. MAHAUL03008/13/1//2012-TC
विशेषांक : एप्रिल २०१८

टाईपसेटींग-लेआऊट
कुलकर्णी टाईपसेटर्स, अहमदनगर ९८५०२३२८९०

मुद्रक
मंगल प्रिटर्स, अहमदनगर

मूल्य :- ३००/-

सदर ग्रंथामध्ये दिलेल्या शोधनिबंधातील विचार, कल्पना व संबंधित लेखासंबंधी संपादक आणि संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

४६) कलावाद आणि जीवनवाद / ३१५
– सुनीता कुलकर्णी
४७) भरतमुनींची रसनिष्पत्ती आणि रसविचार : एक शोध / ३२७
– प्रा.डॉ. एन. डी. चौधरी
४८) रसविचार / ३३२
– राजेश नेटके
४९) लेखकाभ्यास आणि संशोधन स्वरूप व मर्यादा / ३३७
– डॉ. दादासाहेब गिऱ्हे
५०) जनाबाई : बंडखोर स्त्रीवादी कवयित्री / ३४०
– प्रा.डॉ. दत्तात्रय डुंबरे
५१) डॉ. प्रल्हाद लुलेकर यांच्या साहित्याचे संशोधन / ३४८
– डॉ. राम रौनेकर
५२) प्रिया तेंडुलकरांच्या ‘असंही’ या कथासंग्रहाचा चिकित्सक अभ्यास / ३५५
– प्रा. सुजाता गागरे
५३) संशोधनाचे स्वरूप, संकल्पना, प्रयोजने / ३६१
– प्रा. श्रीमती कुंदा बाळासाहेब कवडे

# संशोधनाचे स्वरूप, संकल्पना, प्रयोजने

–प्रा. श्रीमती कवडे कुंदा बाळासाहेब
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
अळकुटी, ता. पारनेर,
जि. अहमदनगर. मो. ९४०३७०७२९२

....................................................................................

'संशोधन' या शब्दाचा अन्वयार्थ पाहिला तर तो आजच्या रुढार्थाहून वेगळा आहे. सं + शुध् म्हणजे संपूर्णपणे सर्वांगांनी शुध्द करणे; दोष काढून टाकून चुकीची दुरुस्ती करून सर्व काही शुध्द, निर्मळ करणे, असा हा मूलार्थ. 'एकनाथांनी ज्ञानेश्वरीचे संशोधन केले'; या विधानातील संशोधन प्रक्रिया याच अर्थाने घेतली जाते, घेतली पाहिजे.

अर्वाचीन काळात 'संशोधन' या शब्दाचा अर्थ 'शोध घेणे' 'नवे उपलब्ध करून देणे' असा करण्यात आला. मराठी भाषा ही दैनंदिन कामकाज आणि व्यवहार यापुरतीच वाढलेली एक भाषा आहे. 'इंग्रजी–मराठी–इंग्रजी' शब्दकोश करणाऱ्या केनडी यांचाही असाच समज होता. या आंग्ल पंडितांना मराठी भाषा ही एक प्रौढ आणि प्रगल्भ भाषा होती. तिच्यामध्ये श्रेष्ठ प्रतीचे साहित्य निर्माण झाले होते; याची कल्पना नव्हती. यासाठी मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा शोध घेऊन ते वाङ्मय प्रकाशित करणे, हे अव्वल इंग्रजीतल्या मराठी पंडितांचे आद्य कर्तव्य ठरले. जुन्या मराठी वाङ्मयाचा शोध घेण्याची क्रिया सुरू झाली. हा काळ 'नवनीत' च्या जन्माचा १८५०–१८५४ काळ होय.

मराठी रियासतीचा इतिहास आपणाकडे सिध्द झालेला नव्हता. खरेतर इतिहासाची आजकालची रुढ संकल्पनाच आपणाकडे नव्हती. बखरी, आत्मवृत्त, रोजनिशी, क्वचित प्रवासकथन असे काही हाताच्या बोटांवर मोजण्याइतपत लेखन झालेले होते. तेव्हा इतिहास सिध्द करण्यासाठी लागणाऱ्या साधनांचा शोध

म्हणजे ऐतिहासिक कागदपत्रे, वंशावळी, करारपत्रे, दानपत्रे, शिलालेख, ताम्रपट, याद्या, सनदा इ. शोध घेण्यास प्रारंभ झाला. इतिहासाची ही जुनी साधनसामग्री शोधणे, ती प्रकाशात आणणे या कृतीस इतिहास – संशोधन संबोधिण्यात आले. 'संशोधन म्हणजे जुन्याचा शोध' असा रुढार्थ झाला.

जुने वाङ्मय आणि ऐतिहासिक कागदपत्रांदी साहित्य यांच्या शोधामागोमाग त्यांच्या संशुध्दीचे व संपादनाचे कार्यही सुरू झाले. पाठ–शुध्दी, संहिता–निश्चिती, लेखन, लेखनकाल–निश्चिती इ. गोष्टी अभ्यासकांना हाती घ्याव्या लागल्या. संशोधन म्हणजे जुने साहित्य मिळविणे, त्यावर यथायोग्य संस्कार करणे त्यासंबंधीची लौकिक माहिती सिध्द करणे, ते प्रकाशात आणणे अशा आधिक नवा अर्थ रुढ झाला व तो चांगला स्थिरपदही झाला. कारण हे कार्य दोनांहून अधिक पिढ्यांना सातत्याने करावे लागले व अजूनही ते संपलेले नाही. ही शोध क्रिया आजही चालूच आहे.

'रिसर्च' या इंग्रजी शब्दासाठी 'संशोधन' हा शब्द वापरला जातो. 'सर्च' म्हणजे 'शोधन'. 'रिसर्च' म्हणजे पुनः केलेले शोधन. शोधन हे एक प्रकारचे 'मूल्यांकन' असते. म्हणून 'पुनः केलेले संशोधन' या शब्द समुदायासाठी 'पुनर्मूल्यांकन' हा शब्द वापरता येईल. विविध क्षेत्रात संशोधन सुरू असते. भौतिक शास्त्रे, सामाजिक शास्त्रे आणि साहित्य या तीनही क्षेत्रांत संशोधन केले जाते. ही तीनही क्षेत्रे भिन्नभिन्न स्वरूपाची आहेत. त्यांच्यात प्रतिभेद आहे. यामुळे या क्षेत्रातील संशोधनाच्या स्वरूपात आणि पध्दतीत ही फरक आहे. क्षेत्र कोणतेही असो संशोधकाला या शास्त्रीय पध्दतीचाच अवलंब करावा लागतो. म्हणून संशोधन या शब्दांच्या अर्थासंबंधी असे म्हणता येईल की, ''संशोधन हा एक शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करून बुध्दिनिष्ठ आणि व्यावहारिक अशा प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्याचा एक प्रयत्न असतो''.

**संशोधनाचे स्वरूप :–**

संशोधनासंबंधीच्या काही व्याख्या दिल्या आहेत. त्यावरून संशोधनाच्या स्वरूपाविषयी कल्पना येऊ शकेल.

''संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्त्वे अथवा तत्त्वे शोधण्यासाठी आणि जुनी तथ्ये तत्त्वे परीक्षणण्यासाठी केलेला चिकित्सक व पध्दतशीर अभ्यास''.

''संशोधन म्हणजे अभ्यासपूर्ण रीतीने केलेली एक चौकशी असते. चिकित्सकपणे सर्वंकष पध्दतीने केलेली ती एक पाहणी असते. त्यात प्रयोगशीलता असते. नव्याने प्रकाशात आलेल्या घटनांच्या प्रकाशात लोकमान्य घटनांचा पुनर्विचार

करण्याचे उद्दिष्ट या पाहणीच्या मुळाशी असते''.

''एखाद्या विशिष्ट विषयासंबंधी विशिष्ट उद्देश मनात धरून आवश्यक ती माहिती मिळविण्याचा साक्षेपी व पध्दतशीर प्रयत्न म्हणजे संशोधन''.

वरील व्याख्यांवरून सहज लक्षात येते की, संशोधनात नवीन तथ्ये शोधण्याचा प्रयत्न असतो. हा प्रयत्न म्हणजे विशिष्ट उद्देश मनात धरून चिकित्सकपणे केलेली पाहणी असते.

'संशोधन' हे मूलतः एक शास्त्र आहे त्याची मूलभूत अशी शास्त्रीय पध्दती आहे. या पध्दतीचा अवलंब संशोधकाला मग ते कोणतेही क्षेत्र असो पायाभूत म्हणून करावाच लागतो. या शास्त्रीय पध्दतीला विचारपध्दती असेही म्हणतात. या पध्दतीच्या पाच पायऱ्या मानण्यात येतात. 'जॉन डयुई' यांनी विचार क्रियेच्या ह्या पायऱ्या सांगितल्या आहेत. या पाच पायऱ्यांत टी.एल. केली यांनी सहाव्या पायरीची भर घातली. या विचार प्रक्रियेला 'डयुई-केली स्टेप्स' असे म्हणतात.

* शंका उपस्थित होणे
* शंकेचे स्वरुप समस्या
* समस्येच्या सोडवणुकीसाठी गृहितकृत्य
* गृहितकृत्याचे परिणाम शोधणे
* गृहितकल्पनेचा स्वीकार किंवा नकार
* निष्कर्ष मांडणे

शेवटच्या पायरीत समस्येच्या सोडवणुकीसाठी कोणता परिणामकारक उपाय हाती लागतो. तो निष्कर्षरूपाने मांडावा लागतो.

**संशोधनाची संकल्पना :-**

कोणत्याही गोष्टीचा अभ्यास आत्मनिष्ठ भूमिकेवरून करता येतो. अथवा वस्तुनिष्ठ भूमिकेवरूनही करता येतो. बालकवींच्या एखाद्या कवितेचे अध्ययन आत्मनिष्ट पध्दतीने करता येते. त्या कवितेत रेखाटले भावचित्राने आपल्याला कसे रोमांचित केले किंवा अस्वस्थ केले हे सांगून तिचे तन्मयतेने रसग्रहण करता येते. उलटपक्षी त्याच कवितेतून व्यक्त झालेल्या कवीच्या भाववृत्तीचे वर्णन तटस्थपणानेही करता येते. कारण संशोधनाची प्रकृती वस्तुनिष्ठ असते. तर्कशुध्दता तटस्थता सूक्ष्मता ही संशोधनाची गृहीतकृत्ये असतात. संशोधन म्हणजे अभ्यासपूर्ण रीतीने घेतलेली एक चौकशी असते. चिकित्सकपणे व सर्वंकष पध्दतीने केलेली ती एक पाहणी असते. त्यात प्रयोगशीलता असते. नव्याने प्रकाशात आलेल्या घटनांच्या प्रकाशात लोकमान्य घटनांचा पुनर्विचार करण्याचे उद्दिष्ट या पाहणीच्या मुळाशी असते.

संशोधनाचा दुसराही एक प्रकार आहे. तो म्हणजे उपलब्ध असलेल्याच ग्रंथातील आशयाचा व त्यातील विचारसरणीचा काही नवा अन्वयार्थ लावून दाखविणे. त्याचे स्वतंत्र इंटरप्रिटेशन करणे. उदा. ज्ञानेश्वरी ही केवळ तत्त्वविवेचनासाठी लिहिलेली नसून हा ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरांच्या विदग्ध रसवृत्तीचा विलास आहे. हा दृष्टिकोन संशोधनात्मकच म्हटला पाहिजे. तसेच संत तुकारामांना झालेला साक्षात्कार कोणत्या स्वरूपाचा होता, त्याचे नेमके रहस्य कोणते, या संबंधी घ्यावयाचा शोध हा या दुसऱ्या प्रकारच्या संशोधनात मोडतो. प्रकाराप्रमाणेच संशोधनाचे विभागही दोन मानता येतील. कर्मयोगावर मीमांसा संताच्या साक्षात्काराचे स्वरूप सावरकरांच्या साहित्यातून प्रतित होणाऱ्या त्यांच्या व्यक्तिमत्वाचे दर्शन हे सारे संशोधन तात्त्विक किंवा मौलिक स्वरूपाचे बुध्दिप्रधान अथवा मूलभूत संशोधन होय. मराठीच्या प्रबंधातील संशोधन मुख्यतः तात्त्विक किंवा मूलभूत स्वरूपाचे असते.

**संशोधनाची प्रयोजने :–**

संशोधनाचा उपयोग काय असा प्रश्न पुष्कळदा उपस्थित केला जातो. ज्याच्या अंगी संशोधनाची कुवत नसते असे लोक असला प्रश्न उपस्थित करतात. संशोधनाची तात्कालिक उपयुक्तता विशद करता येणार नाही. संशोधनाची उपयुक्तता ही दूरगामी असते. विज्ञानक्षेत्र, सामाजिक क्षेत्र आणि साहित्य क्षेत्र या तीनही क्षेत्रात संशोधन सुरू असते. प्रत्येक क्षेत्राचे वैशिष्ट्ये वेगळे आहे. त्याचे स्वरूपही वेगळे आहे आणि प्रयोजनही वेगळे आहे. प्रत्येक क्षेत्रातील संशोधनाची उपयुक्तता त्या त्या क्षेत्राला असतेच. क्षेत्रपरत्वे प्रयोजनभिन्नता असते. असे म्हणावयास हरकत नाही, तरी ज्ञानात भर घालणे हे कोणत्याही संशोधनाचे महत्त्वाचे प्रयोजन असते. संशोधन प्रकल्प पूर्ण केल्यानंतर होणारा आनंद हा केवळ आनंद नसतो तर परमानंद असतो. हा आनंद प्राप्त झाल्यानंतर संशोधकाला जे आत्मिक समाधान होते त्याचे स्वरूप संशोधकाशिवाय इतरांना कळू शकणार नाही.

मानवी जीवन संशोधनामुळे संपन्न करणे असेही एक प्रयोजन संशोधकाचे सांगितले जात असले तरी संशोधनात व्यावहारिक हेतू असतो. हे नाकारता येणार नाही. विद्यापीठ अनुदान मंडळाच्या सेवानियमांची पूर्तता करण्यासाठी पुष्कळदा विद्यापीठीय संशोधन हाती घेतले जाते, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. या पूर्ततेमुळे अर्थलाभ होते, वेतनवाढ होते, व्यावहारिक स्थिरता येते. शिक्षणक्षेत्रात यश मिळते व कीर्ती मिळते. हे खरे असले तरी ही सर्व प्रयोजने वि.तीजन्य आहेत. ज्ञानप्राप्तीचा हेतू अशा संशोधनात नसतो. त्यात कोणत्याही प्रकारचे सातत्य नसते.

विद्यापीठात चालणारे संशोधन आणि विद्यापीठाबाहेर चालणारे संशोधन असे दोन प्रकारचे संशोधन आपणांस दिसून येते. विद्यापीठात चालणारे संशोधन हे जिज्ञासेतून स्वयंप्रेरणेतून निर्माण झालेले नसते. व्यावसायिक प्रेरणा त्यामागे असते. हे पोटार्थी संशोधन असते. केवळ ज्ञानप्राप्तीच्या हेतूतून विद्यापीठाबाहेर चालणारे संशोधन पुष्कळदा खरेखुरे संशोधन असते. लेखकाची नवनिर्माणक्षमता याचा शोध घेणे हे आधुनिक साहित्याच्या संशोधनाचे प्रयोजन असते.

संशोधनाची प्रयोजने अनेक स्वरूपाची असू शकतात. ती संशोधक सापेक्ष आहेत. इतिहासजमा झालेल्या संकेतादिकांचे स्पष्टीकरण करून भूतकालीन जीवन वर्तमानाच्या आकलनक्षेत्रात आणून सोडणे हे संशोधनाचे प्रयोजन असते. ग्रंथ कोणत्याही काळातील असो समकालीन, सामाजिक व सांस्कृतिक जीवन आणि साहित्यविषयक धारणा यांना त्या ग्रंथात प्रतिबिंबीत झालेल्या असतात. त्याचा शोध घेणे महत्त्वाचे असते. शेवटी असे म्हणता येईल की, संशोधनाची प्रयोजने ही संशोधक सापेक्ष व संशोधनविषयक सापेक्ष आहेत.

संदर्भ :-


१) भाषा व साहित्य संशोधन : खंड पहिला, संपादक - डॉ. वसंत स. जोशी, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे. १९८१

२) मराठी साहित्यसंशोधन - स्वरूप आणि दिशा - डॉ. श. रा. राणे, का. स. वाणी प्रगत अध्ययन संस्था, धुळे.

३) भाषा व साहित्य संशोधन - खंड २, संपादक - डॉ. वसंत जोशी आणि डॉ. गं. ना. जोगळेकर, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे. १९८५

४) भाषा व साहित्य संशोधन - खंड ३, संपादक - डॉ. वसंत जोशी आणि म. ना. अदवंत, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे. १९८९

५) संशोधन पध्दतीशास्त्र - डॉ. रा. र. बोरुडे, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे. प्रथम आवृत्ती १७ सप्टेंबर २००५.

६) संशोधन स्वरूप आणि पध्दती - संपादक डॉ. सु. रा. चुनेकर, रंगनाथ पठारे. शि. प्र. संस्था, संगमनेर, १९८३.


●●●

'संशोधनाच्या नव्या दिशा' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रावर आधारित हा ग्रंथ. यातून मराठी साहित्यक्षेत्रातील संशोधनाच्या नव्या दिशांचे ज्ञान होईल. तसेच संशोधनाची संकल्पना, संशोधनाच्या विविध पद्धती, संशोधनाची तंत्र व साधने, संशोधनात्मक लेखन, मराठी साहित्य संशोधनाचे विविध प्रकार, साहित्याचा इतर सामाजिक शास्त्रांशी असणारा संबंध यांचे ज्ञान होईल. या हेतूने हा संशोधन ग्रंथ संपादित करण्यात आला आहे.

मराठी संशोधन केंद्र

हिंद सेवा मंडळाचे

**पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर**

Phone : (0241) 2431337, 2431433, 2430457

Website : www.sardacollege.com

Email : sardacollege_anr@dataone.in



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नित
हिंद सेवा मंडळाचे,

# पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर.

नॅक पुनर्मूल्यांकित 'A' ग्रेड प्राप्त

मराठी संशोधन केंद्र
व
**विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली**
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
दोन दिवसीय
राष्ट्रीय चर्चासत्र
**दि. २३ व २४ एप्रिल २०१८**
**विषय – 'संशोधनाच्या नव्या दिशा'**

## प्रमाणपत्र

श्री./श्रीमती/प्रा.डॉ. कवडे कुंदा बाळासाहेब.
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकुटी.

यांनी दिनांक २३ व २४ एप्रिल २०१८ रोजी आयोजित केलेल्या **'संशोधनाच्या नव्या दिशा'** या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात सत्राध्यक्ष / वक्ता / शोधनिबंध वाचक / प्रतिनिधी म्हणून सक्रिय सहभाग घेतला. त्याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| **डॉ. माहेश्वरी गावित** | डॉ. रेखी **डॉ. अमरजा रेखी** |
| समन्वयक | प्र. प्राचार्य |
| मराठी संशोधन केंद्र व राष्ट्रीय चर्चासत्र | पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर. |